# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 103 व 104 अन्वये
**{लेखा व वित्त विभाग}** सन 2023-2024 चे सुधारित व कलम 95,96,100 च्या तरतुदीनुसार सन 2024-2025 चा प्रस्तावित अर्थसंकल्प दोन भागात तयार करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, शासन आदेश क्रमांक एम सी ओ 2020/ प्रक्र 71/(भाग2) नवि 14 मंत्रालय मुंबई दिनांक 3 मार्च 2022 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम 452 अ च्या (1अ) व 1 (ब) येथील तरतुदीनुसार दिनांक 04/03/2022 रोजी मुदत संपलेल्या नागपूर महानगरपालिका येथे प्रशासकपदी आयुक्त, महानगरपालिका यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. त्यानुसार महानगरपालिका अधिनियमातील कलम 452 (2) (क) अन्वये असलेल्या अधिकारानुसार सर्व समित्यांचे अधिकार व कर्तव्ये महानगरपालिका विसर्जनाच्या कालावधीत मा. आयुक्त तथा प्रशासक यांना आहे. त्यामुळे नागपूर महानगरपालिकेचे सन 2023-2024 चे सुधारीत व सन 2024-2025 चे प्रस्तावित (अ व क) तसेच परिवहन समितीव्दारा प्रस्तावित अर्थसंकल्प "**ब**" सादर केल्याप्रमाणे अ, क व ब अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 95 अन्वये स्थायी समितीस सादर सादर करण्यात आले यास स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक 796 दिनांक 29.2.2024 नुसार अंतिम मंजुरी करीता महानगरपालिकेस सादर करण्याची शिफारस करण्यास मंजुरी प्रदान केलेली आहे. त्यानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 96 अन्वये तयार करण्यात आलेले अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक महानगरपालिके समोर ठेवण्यास आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 100 अन्वये अंदाजपत्रकास अंतिम स्विकृती देण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे मान्यतेस ठेवण्याचा प्रश्न विचारात घेणे.
टिप : सविस्तर टिपणी नस्तीत उपलब्ध आहे.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक :- 57/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 11/03/2024**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार प्रमुख लेखा व वित्त अधिकारी, लेखा व वित्त विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 103 व 104 अन्वये सन 2023-2024 चे सुधारित व कलम 95,96,100 च्या तरतुदीनुसार सन 2024-2025 चा प्रस्तावित अर्थसंकल्प दोन भागात तयार करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, शासन आदेश क्रमांक एम सी ओ 2020/ प्रक्र 71/(भाग2) नवि 14 मंत्रालय मुंबई दिनांक 3 मार्च 2022 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम 452 अ च्या (1अ) व 1 (ब) येथील तरतुदीनुसार दिनांक 04/03/2022 रोजी

मुदत संपलेल्या नागपूर महानगरपालिका येथे प्रशासकपदी आयुक्त, महानगरपालिका यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. त्यानुसार महानगरपालिका अधिनियमातील कलम 452 (2) (क) अन्वये असलेल्या अधिकारानुसार सर्व समित्यांचे अधिकार व कर्तव्ये महानगरपालिका विसर्जनाच्या कालावधीत मा. आयुक्त तथा प्रशासक यांना आहे. त्यामुळे  नागपूर महानगरपालिकेचे सन 2023-2024 चे सुधारीत व सन 2024-2025 चे प्रस्तावित (अ व क) तसेच परिवहन समितीव्दारा प्रस्तावित अर्थसंकल्प "**ब**" सादर केल्याप्रमाणे अ, क व ब अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 95 अन्वये स्थायी समितीस सादर सादर  करण्यात आले यास स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक 796 दिनांक 29.2.2024 नुसार अंतिम मंजुरी करीता महानगरपालिकेस सादर करण्याची शिफारस करण्यास मंजुरी प्रदान केलेली आहे. त्यानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 96 अन्वये तयार करण्यात आलेले अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक महानगरपालिके समोर ठेवण्यास आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 100 अन्वये अंदाजपत्रकास अंतिम स्विकृती  देण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.